# ग्रामीण आर्थिक विकासात कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी दुध उत्पादक संस्थेची भूमिका

**श्रीमती एस.सी.इंगवले,** संशोधक विध्यार्थिनी ,वाणिज्य आणि व्यवस्थापन अधिविभाग , शिवाजी विद्यापीठ , कोल्हापुर

.................................................................................................................................................

**प्रस्तावना :**

सहकार हा भारताचा कणा आहे. सहकाराच्या माध्यमातून सहकारी संस्था, संघ स्थापन करण्यामध्ये, त्या चालवण्यामध्ये आणि त्या संस्था वाढविण्यामध्ये सर्वसामान्य नागरिकांचा मोठा सहभाग आहे. या सहकाराच्या माध्यमतून दुध उत्पादन संस्थाचा विकास झाला व ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कोल्हापूर जिल्ह्यातील सहकाराने मोठा वेग घेतल्याचे दिसून येते. सहकार रुजविण्यामध्ये आणि तो वाढविण्यामध्ये कोल्हापूर जिल्हा राज्यात अग्रेसर आहे. सहकाराच्या माध्यमातून विविध उद्योग, व्यवसाय कोल्हापूर जिल्ह्यात उभे राहिले. कोल्हापूर जिल्ह्यात या काळात सहकाराचे जाळे निर्माण झाले याचे खरे श्रेय राजर्षी शाहू महाराज यांचे योगदान महत्वाचे आहे. कोल्हापूर संस्थानात सहकारी चळवळीतून जिल्ह्यातील शेतीला जोडधंदा म्हणून स्वीकारलेला दूध व्यवसाय जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात स्वीकारला गेला आहे. त्याचबरोबर कोल्हापूर जिल्ह्यातील दूध संघ, दूध संस्थांमुळे सामाजिक व आर्थिक बदल मोठ्या प्रमाणात झाले. प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या अनेकांच्या जीवनात याच व्यवसायाने बदल घडवून आणले आहेत.

**उद्देश :**

1. महाराष्ट्रातील सहकाराच चळवळीचा आढावा घेणे
2. सहकार चळवळ आणि दुध उत्पादन संस्थेचा अभ्यास करणे
3. कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी दुध संस्थाची दुध उत्पादकाबाबत ग्रामीण आर्थिक विकासातील भूमिकाचा अभ्यास करणे

**सहकारी चळवळ :** कौटुंबिक पातळीवरून दूध संघांच्या पातळीपर्यंत दुग्ध व्यवसाय एकोणिसाव्या शतकाच्या मध्याला सुरुवात झाली. या दुग्ध व्यवसायाच्या क्षेत्रातील परिवर्तन युरोपमध्ये औद्योगिक क्रांतीमुळे घडून आले. याला कारण शहरामधून मोठ्या प्रमाणात वाढलेली दुधाची मागणीही आहे. १८७१ साली जगातली पहिली सहकारी दूध संस्था न्यूझीलंडमधील ओटेंगो पेनिन्सुला येथे स्थापन झाली असून डेन्मार्कने सहकारी क्षेत्रात गती घेतली असून त्यानंतर सर्व युरोप आणि अमेरिकेत ही सहकारी चळवलिचा विकास झालेला दिसतो. मात्र भारतात दुग्ध व्यवसायाकडे उदरनिर्वाहाचे साधन म्हणून पहिले जात होते. याला सहकार चळवळीतूनदुध उत्पादनाचे महत्व समजून देण्यासाठी भारतात १९१७ मध्ये उत्तर प्रदेशातील अलाहाबाद शहरात सर्वात प्रथम दूध सहकारी संस्थेची नोंदणी करण्यात आली. त्यानंतर बडोदा, बेळगाव, धुळे, भागलपूर, हुबळी याठिकाणी अनेक सहकारी दूध संघ स्थापन झाले. यानंतर दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटी देशात १९ दूध पुरवठा संघ होते. तर प्राथमिक दूध संस्थांची संख्या २६४ इतकी होती.यानंतर देशात दूध संघांची संख्या वाढत गेली त्याचबरोबर जिल्हा दूध संघांची, तालुका दूध संघांची व प्राथमिक सहकारी दूध संस्थांची संख्या वाढत गेल्याचे दिसून येते.

महाराष्ट्रात सहकार चळवळीचा कायदा १९०४ चा कायदा पास झाला.त्यानंतर १९१२ चा सहकारी चळवळीचा कायदा करून प्रोत्साहन देण्यात आले. महाराष्ट्रात सहकारी कायदा १९६० झाल्यानंतर खऱ्या अर्थाने मोठ्या प्रमाणात सहकारी संस्थाचे जाळे निर्माण झाले. सहकारी चळवळीचा महाराष्ट्रात जेवढ्या मोठ्या प्रमाणात वापर करण्यात आला आहे, तेवढ्या मोठ्या प्रमाणावर भारतातील अन्य कोणत्याही राज्यात झालेला दिसत नाही. महाराष्ट्रात दुग्ध व्यवसायाच्या, दूध संघांच्या उदय-विकासाला पोषक वातावरण राहिले. महाराष्ट्र शासनाने दूध संघांच्या उदय-विकासाला हातभार लावला आहे. राष्ट्रीय दुग्ध व्यवसाय विकास मंडळाच्या माध्यमातून देशभरात राबवलेल्या दूध महापूर योजनेचा राज्याला मोठा फायदा झाला.

**सहकारी चळवळ व कोल्हापूर दुध व्यवसाय :**

कोल्हापूर जिल्ह्यात पहिली कृषी सहकारी सेवा संस्था शिरोळ तालुक्यातील धरणगुत्ती या गावी १९३९ मध्ये हरिजन सामुदायिक सहकारी शेती संस्था या नावाने स्थापन झाली. दुग्ध व्यवसाय हा शेतीचा जोडधंदा म्हणून ओळखला जात असल्याने व सहकारी दूध संघांच्या माध्यमातून बदल घडून येऊ लागला. याचा प्रभाव शेतमजूरी कमी करण्याचा प्रयत्न केला. याच काळात शेती, जलसिंचन यांचा विकास झाल्याने परिणामी गोकुळ, यळगूड आणि वारणासह इतर काही दूध संघांचा विकास झाला असून मोठ्या प्रमाणात दूध उत्पादक, पशुपालक दूध व्यवसायाकडे वळले. परिणामी कोल्हापूर जिल्ह्यात ग्रामीण भागात आर्थिक बदल घडून येऊ लागले. त्यामुळे ९४३ सहकारी संस्था दूध पुरवठा संस्था निर्माण झाल्या. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध संघ, श्री.हनुमान सहकारी व्यावसायिक व कृषिपूरक दूध संस्था व श्री

वारणा सहकारी दूध संघ सहकारी तत्त्वावर स्थापन झाले. यामुळे जिल्ह्यातील दुग्ध व्यवसायाला झपाट्याने विकसित झाले असून सहकाराच्या माध्यमातून दुध व्यवसायला बळकटी मिळाली. शेतीला जोडधंदा म्हणून बघीतला गेल्याने या व्यवसायाने सहकाराच्या माध्यमातून कात टाकली. गरीब, भूमिहीन व अल्पभूधारकांचे दुग्ध व्यवसाय हे उदरनिर्वाहाचे तर सधन शेतकऱ्यांना नवा उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण झाला.

**सहकारी दुध संस्थाची दुध उत्पादकाबाबत ग्रामीण आर्थिक विकासातील भूमिका**

कोल्हापूर जिल्ह्यात सहकारी दुध संस्थाच्या माध्यामतून कोल्हापूर जिल्ह्यात ग्रामीण भागात आर्थिक व सामाजिक बदलासाठी मोठे योगदान दिले आहे. या संस्थाच्या माध्यमातून गोकुळ दुध संघाने कोल्हापूर जिल्ह्यात संकरित गायी आणण्याचा हा पहिला प्रयोग झाला. या सहकारी दुध संघाच्या कार्याचा व दुध उत्पादानाचा जिल्ह्यातील महिला, दारिद्रयरेषेखालील घटक, गरीब, शेतमजूर, भूमिहीनांना मोठा फायदा झाला. याच बरोबर कोल्हापूर शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणीच्या काळात त्यांना मदत व्हावी म्हणून दूध संघाने बिनपरतीच्या ठेवींचा निकष बदलला आणि ठेवी परत करण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला. दुग्धव्यवसायातून ग्रामीण भागात जातिवंत जनावरांची पैदास करण्यापासून दूध उत्पादन वाढविण्यासाठी शेतकरी मोठ्या प्रमाणात सहभागी करून घेतले गेले. कोल्हापूर जिल्ह्यातील शाहुवाडी, पन्हाळा, राधानगरी, भुदरगड, गगनबावडा, चंदगड, आजरा या तालुक्यात भात शेती उत्पन्न पक्त होत असल्याने येथे मिळत असलेल्या मुबलक चारचा दुग्ध उत्पन्नासाठी वापर केला गेला आणि लोकांनी दुग्ध जनावरामचा व्यावसायिक दृष्टिकोनातून अवलबून सहकाराच्या माध्यमातून दुग्ध व्यवसाय सुरु केला ज्याचा परिणाम गावांचा आर्थिक कायापालट होण्यास सुरुवात झाली. तसेच दुर्गम खेडी दुग्ध व्यवसायामुळे शहरी विकासाच्या प्रक्रियेत आली.

सहकारी दुग्ध व्यवसायाच्या विकास प्रक्रियेमुळे पशुखाद्याची दुकाने, जनावरांना आवश्यक असणारे डॉक्टरांचे फिरते दवाखाने निर्माण झाले. तसेच दूध बिला बँका व पतसंस्थांच्या या माध्यमातून मिळू लागले. काही दूध संकलन संस्थांमध्ये रोखीने मिळू लागले. यामुळे गावातील आर्थिक उलाढाल वाढली. खेडी स्वयंपूर्ण होण्यामध्ये दुग्ध व्यवसायाने मोठे योगदान दिले आहे. शेतकऱ्यांचे परावलंबित्व कमी होण्यास सुरु झाली. ग्रामीण भागात सहकारी दुध संस्थाची दुध उत्पादकातून रोजगारात वाढ झाली. दूध व्यवसायाच्या यशस्वीतेमुळे बेरोजगार व भूमिहीन यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्याची संधी प्राप्त झाली. कोल्हापूर जिल्ह्यात दुग्ध व्यवसायाबरोबरच दुग्धपदार्थ विकून अनेक युवक खेडोपाडी स्थिर झाले आहेत.

ग्रामीण भागात दुध उत्पादन संस्थातून आर्थिक सुबकत ग्रामीण भागातील दुध उत्पादकांना मिळू लागली असल्याने त्यांना ग्रामीण भागात बँका, पतसंस्था आर्थिक दुर्बल घटकांना सन्मानाची वागणूक दिली. दुग्ध व्यवसायाने सामान्यांच्या जीवनात घडून आलेला हा मोठा आर्थिक बदल झालेला दिसतो. प्राथमिक दूध संस्था या दूध उत्पादकांचा आर्थिक आधार बनल्या आहेत. या दूध व्यवसायात महिलांचा मोठा सहभाग असलायचे दिसून येते. भूमिहीन शेतकऱ्यांच्या उत्पन्नापैकी ५३ टक्के उत्पन्न केवळ दुग्ध व्यवसायापासून मिळते. यात दुधाच्या उत्पन्नामध्ये स्त्रियांचा सहभाग ९० यटक्के काम स्त्रियाच करत असल्याचे दिसते.

**सारांश :**

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये सहकार आणि त्यातून उभा राहिलेल्या सहकारी संस्थांचे जाळे अत्यंत चांगल्या पद्धतीने विस्तारले असून कोल्हापूर जिल्ह्यामध्ये सहकाराच्या माध्यमातून उभ्या राहिलेल्या दूध संघांनी दूध उत्पादकांच्या जीवनात मोठ्या प्रमाणात आर्थिक बदल घडून आले. भूमिहीन, अल्पभूधारक, शेतमजूर असे कोणीही दुग्ध व्यवसाय करु लागले. शेतीला जोडधंदा म्हणून सुरू झालेला हा दुग्ध व्यवसाय कोल्हापूर जिल्ह्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला कलाटणी देणारा ठरला.

**संदर्भसूची :**

1. चौधरी कि. का. (संपा), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर कोल्हापूर जिल्हा, अध्यक्ष, संपादक मंडळ, दार्शनिका विभाग, सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८९
2. भोळे भास्कर लक्ष्मण, किशोर बेडकिहाळ (संपा), बदलता महाराष्ट्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा, १६ जुलाई २००३
3. दैनिक पुढारी, कोल्हापूर, २० ऑगस्ट २००५
4. रोडे दीपक (संपा.), सहकारी महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या., पुणे, एप्रिल २००२
5. डॉ. पाटील टी. एस., राजर्षी शाहू छत्रपती (१८७४-११९२), श्रमिक प्रतिष्ठान कोल्हापूर, प्रथमावृत्ती, सप्टेंबर २०१२